फौ.खटला क्र:१३३१/२०२५
वृध्देश्वर अर्बन मल्टी वि ज्योती शेलार
निशाणी क्र.

**<u>आरोपीचा ३५१ बी.एन.एस.एस. प्रमाणे खालील जबाब.</u>**

आरोपीचे नांव – **ज्योती राजु शेलार,**

वय– ४० वर्ष, धंदा– मार्केटींग,

राहणार– वैष्णव नगर, केडगाव, अहमदनगर.

| | |
|---|---|
| प्रश्न १: | फिर्यादीतर्फे घेण्यात आलेला पूरावा तूम्ही ऐकला का व तो तुम्हाला समजला का? |
| उत्तर : | होय. |
| प्रश्न २: | फिर्यादी साक्षीदार क्र.१ अमोल संतराम गावडे यांचे पुराव्यात असे आले आहे की, फिर्यादी संस्था ही बहुराज्यीय सहकारी कायदा अधिनियम २००२ अन्वये नोंदविलेली असून तिची मुख्य शाखा श्रीगोंदा येथे आहे. फिर्यादी संस्थेचा मुख्य व्यवसाय वेगवेगळया कारणासाठी सभासदांना कर्ज पुरवठा करते व त्यावर व्याज आकारणी करते, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे? |
| उत्तर : | माहित नाही. |
| प्रश्न ३: | सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, फिर्यादी संस्थेने त्यांना संस्थेच्या वतीने थकबाकीदारां विरुध्द योग्य ती व आवश्यक कोर्ट कार्यवाही करणे, न्यायालयात केसेस दाखल करणे व जाब जबाब देणे, पुरावे देणे, तडजोड करणे इ. अधिकार ठरावाव्दारे दिलेले आहेत, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे? |
| उत्तर : | माहित नाही. |
| प्रश्न ४: | सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, तुम्ही फिर्यादी संस्थेकडुन बचत गट या योजने अंतर्गत कारगी महिला बचतगटाच्या व्यवसाय वाढीसाठी पैशाची गरज असल्याने तुम्ही बचत गटाचे सभासद या नात्याने कर्ज मिळण्यासाठी अर्ज करून १,८०,०००/– इतक्या रकमेची मागणी केली. तुम्हाला सदर कर्ज रक्कम रुपये १,८०,०००/– दिनांक ११/०९/२०१९ रोजी संस्थेच्या सर्व अटी, शर्तीची व कागदपत्रांची पुर्तता करुन देउन घेतले होते, याबाबत तुम्हास काय सांगावयाचे आहे? |
| उत्तर : | हे म्हणणे खरे नाही. |
| प्रश्न ५: | सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, सदर कर्जाची परतफेड तुम्ही मुदतीत केली नाही व बाकी थकविली म्हणुन सदर संस्थेने तुमच्याकडे |

| | |
|---|---|
| | लेखी व तोंडी स्वरुपात थकबाकी रक्कमेची मागणी केली असता तुम्ही कर्जाच्या परतफेडीसाठी दिनांक १९/१२/२०२४ रोजी रक्कम रुपये ५८,०८३/— भारतीय स्टेट बॅंक, शाखा केडगाव, अहमदनगर ता.जि. अहमदनगर या बॅंकेचा धनादेश क्र.४२०१२८ फिर्यादी संस्थेस दिला, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे? |
| उत्तर : | हे म्हणणे खरे नाही. |
| प्रश्न६: | सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, सदरचा धनादेश फिर्यादी संस्थेने त्यांचे खाते असलेल्या बॅंकेत भिंगार अर्बन को. ऑप बॅंक लि. शाखा माळीवाडा, अहमदनगर, ता.जि.अहमदनगर येथे भरला असता तो '**फंडस इनसफिशियंट**' असा शेरा असलेला मेमो दिनांक २१/१२/२०२४ रोजीचा धनादेशासह परत पाठविला, याबाबत तुम्हास काय सांगावयाचे आहे? |
| उत्तर: | हे म्हणणे खरे नाही. |
| प्रश्न:७ | सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, फिर्यादी संस्थेने तुम्हाला दिनांक २७/१२/२०२४ रोजी वकिलांमार्फत नोटीस पाठवुन चेकच्या रक्कमेची मागणी केली, तरी देखील तुम्ही मुदतीत पैसे परत दिले नाहीत करीता फिर्यादी संस्थेने तुमचे विरुध्द सदरची केस निगोशिएबल इंस्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ अन्वये दाखल केली, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे? |
| उत्तर : | नोटीस मिळाली नाही. |
| प्रश्न ८: | फिर्यादी अमोल संतराम गावडे हे तुमच्या विरूध्द का सांगतात? |
| उत्तर : | माहित नाही. |
| प्रश्न ९: | नि.क्र.१६ वरील ठरावाबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर : | हे खरे नाही. |
| प्रश्न १०: | नि.क्र.१७ वरील धनादेशाबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर : | हे खरे नाही. |
| प्रश्न ११: | नि.क्र.१८ वरील रिटर्न मेमो पावती बदद्ल तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर : | हे खरे नाही. |
| प्रश्न १२: | नि.क्र.१९ वरील नोटीस स्थळप्रतबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर : | नोटीस मिळाली नाही. |
| प्रश्न १३: | नि.क्र.२० वरील आर.एल. रिसीटबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर : | हे खरे नाही. |
| प्रश्न १४: | नि.क्र.२१ वरील पोस्टाचे पाकीटाबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर : | हे खरे नाही. |

| | |
|---|---|
| प्रश्न १५: | नि.क्र.२२ वरील कर्ज मागणी अर्जाबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर : | हे खरे नाही. |
| प्रश्न १६: | नि.क्र.२३ वरील कर्ज रोखाबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर : | हे खरे नाही. |
| प्रश्न १७: | नि.क्र.२४ वरील वचनचिठ्ठीबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर : | हे खरे नाही. |
| प्रश्न १८: | नि.क्र.२५ वरील खातेउतारा व भारतीय अधिनियम ६३ चे प्रमाणपत्राबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर : | हे खरे नाही. |
| प्रश्न १९: | नि.क्र.२६ वरील व्यवसायासाठी कर्ज मागणी अर्जाबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर : | हे खरे नाही. |
| प्रश्न २०: | नि.क्र.२७ वरील वचनचिठ्ठीबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर : | हे खरे नाही. |
| प्रश्न :२१ | तुम्हाला स्वत:ला शपथेवर तपासायचे आहे काय किंवा अन्य साक्षीदार तपासायचे आहेत काय? |
| उत्तर : | होय. |
| प्रश्न :२२ | तुम्हाला बचावाखातर काही कागदपत्र दाखल करावयाचे आहेत काय? |
| उत्तर : | होय. |
| प्रश्न :२३ | प्रकरणबाबत आणखी काही सांगावयाचे आहे का? |
| उत्तर : | खोटे प्रकरण दाखल केले. |

समक्ष

.............................

सही/—

**(माधुरी रा. खनवे)**

आरोपीची सही/आंगठा

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
कोर्ट क्र.०४, अहदमनगर

<u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, आरोपीचा उपरोक्त जबाब माझ्या समक्ष नोंदविण्यात आला असून तो त्याने सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे.

सही/—

**(माधुरी रा. खनवे)**

दिनांक : २७/११/२०२५

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
कोर्ट क्र.०४, अहदमनगर